पुण्यनगरी



# मानवी आरोग्यावर ई-कचऱ्याचे घातक परिणाम

## डॉ. रानिया लम्पाऊ



डॉ. रानिया लम्पाऊ.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे (ई-कचरा) अयोग्य व्यवस्थापन हे आज जागतिक स्तरावर मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत घातक ठरत असून, याचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत असल्याची चिंता ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार आणि विचारवंत डॉ. रानिया लम्पाऊ यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी 'मिशन लाईफ अभियान' अंतर्गत डॉ. लम्पाऊ यांचे 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची यावेळी अध्यक्षस्थानी उपस्थिती होती.

डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, असंघटित क्षेत्रात कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय ई-कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या कामगारांचे आरोग्य गंभीर धोक्यात आहे. हा कचरा उघड्यावर जाळल्याने यामधील पारा, कॅडमियम इत्यादी विषारी मूलद्रव्यांच्या विषारी धुरामुळे कामगारांना फुफ्फुसाचे गंभीर आजार होत असून, यकृताचे, मूत्राशयाचे नुकसान आणि कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पुरेशा सुरक्षेच्या अभावामुळे या कामगारांना आयुष्यभर अपंगत्व आणि इतर शारीरिक दुखापतींना सामोरे जावे लागत आहे.

या संदर्भातील जनजागृतीमध्ये महाविद्यालये आणि विद्यापीठांची भूमिका महत्त्वाचे असल्याचे सांगून डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, सध्याच्या तरुण पिढीमध्ये गॅझेटस् आणि नवनवीन उपकरणे बदलण्याचा वेग प्रचंड असल्याने कॅम्पस स्तरावर ई-कचरा तयार होतो, यासाठी विद्यापीठांनी कडक ई-कचरा व्यवस्थापन धोरण आखणे आवश्यक आहे. विद्यार्थी या चळवळीत 'बदलाचे दूत' म्हणून महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. योग्य ई-कचरा व्यवस्थापनामुळे सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासोबतच नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि हे पाऊल संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांची पूर्तता करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, डॉ. लम्पाऊ यांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे असून, ई-कचऱ्याच्या समस्येला असणारे विविध आयाम आणि त्याच्या व्यवस्थापनाचे महत्त्व अतिशय नेमकेपणाने प्रभावी पद्धतीने सांगितले आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाचे ई-कचरा व्यवस्थापन केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्र या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तसेच ई-कचरा संकलन ही शिवाजी विद्यापीठातील नियमित प्रक्रियेचा भाग असेल आणि या संदर्भात काही लघु अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील, असे सांगितले.

सुरुवातीला इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

2 8 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरु डॉ. कामत यांची विवेकानंद कॉलेजला सदिच्छा भेट

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर. के. कामत यांनी विवेकानंद महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. सदर भेटीमध्ये त्यांनी प्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. कामत यांचे पुष्पगुच्छ, शाल, संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी त्यांनी कुलगुरु डॉ. कामत यांच्या शैक्षणिक योगदानाचा उल्लेख केला. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठात कुलगुरु म्हणून नियुक्ती झालेले डॉ. कामत हे संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स् विषयाचे माजी विद्यार्थी आहेत. तसेच डॉ. कामत यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक म्हणूनही सेवा बजावली आहे.

या विद्यापीठाच्या एकूण १४ कुलगुरुंपैकी ५ कुलगुरु हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत.



याप्रसंगी डॉ. कामत म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरु पदापर्यंतचा माझा प्रवास झाला आहे. मी या संस्थेचा विद्यार्थी आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेतील अनेक गुरुदेव कार्यकर्ते हे कुलगुरु होण्याच्या पात्रतेचे आहेत.

यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.

28 MAY 2026

जनप्रवास

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी कडक ई-कचरा व्यवस्थापन धोरण आखावे

## ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ : ई-कचऱ्याच्या अनिर्बंध वाढीमुळे समाजात आरोग्याची समस्या

**जनप्रवास : कोल्हापूर**

इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे (ई-कचरा) अयोग्य व्यवस्थापन हे आज जागतिक स्तरावर मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत घातक ठरत असून,याचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत असल्याची चिंता ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार आणि विचारवंत डॉ. रानिया लम्पाऊ यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठात विशेष ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. याचवेळी त्यांनी सध्याच्या तरुण पिढीमध्ये गॅजेट्स आणि नवनवीन उपकरणे बदलण्याचा वेग प्रचंड असल्याने कॅम्पस स्तरावर ई-कचरा मोठ्या प्रमाणात तयार होतो,यासाठी विद्यापीठांनी कडक ई-कचरा व्यवस्थापन धोरण आखणे आवश्यक आहे. विद्यार्थी या चळवळीत'बदलाचे दूत'म्हणून महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असेही स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव या होत्या.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन लाईफ अभियाना'अंतर्गत डॉ. लम्पाऊ यांचे'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास'या



विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

ई-कचऱ्याच्या अनिर्बंध वाढीमुळे समाजात आरोग्याची मोठी समस्या निर्माण होत असल्याचे सांगताना डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, असंघटित क्षेत्रात कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय ई-कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या कामगारांचे आरोग्य गंभीर धोक्यात आहे. हा कचरा उघड्यावर जाळल्याने यामधील पारा, कॅडमियम इत्यादी विषारी मूलद्रव्यांच्या विषारी धुरामुळे कामगारांना फुफ्फुसाचे गंभीर आजार होत असून,यकृताचे, मूत्राशयाचे नुकसान आणि कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पुरेशा सुरक्षेच्या अभावामुळे या कामगारांना आयुष्यभर अपंगत्व आणि इतर शारीरिक दुखापतींना सामोरे जावे लागत आहे.

ई-कचऱ्याच्या समस्येचा सर्वात क्रूर आणि घातक परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर होत असल्याबद्दल डॉ. लम्पाऊ यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. त्या म्हणाल्या, लहान मुलांची शरीरे प्रौढांच्या तुलनेत विषारी रसायनांना खूप लवकर बळी पडतात,कारण त्यांची जैविक संवेदनशीलता उच्च दर्जाची असते. त्यातच त्यांच्या शरीरात पर्यावरणातील विषारी घटकांचे शोषण त्यांच्या शरीरात वेगाने होते,तर दुसरीकडे मुलांमधील नैसर्गिक उत्सर्जन व विषमुक्ती यंत्रणा पूर्णपणे विकसित झालेली नसते. या समस्येची दुसरी गडद बाजू म्हणजे,अनेक अनधिकृत रिसायकलिंग केंद्रांमध्ये होणारे बालमजुरीचे शोषण लहान मुलांचे संपूर्ण भविष्य अंधारात ढकलत आहे.

या जागतिक संकटावर मात करण्यासाठी डॉ. लम्पाऊ यांनी,'सर्क्युलर इकॉनॉमी'आणि' फाईव्ह आर'म्हणजेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर कमी करणे ,पुनर्वापर करणे,दुरुस्ती करणे,नूतनीकरण आणि शास्त्रीय पद्धतीने पुनर्प्रक्रिया करणे या पंचसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. या संदर्भातील जनजागृतीमध्ये महाविद्यालये आणि विद्यापीठांची भूमिका महत्त्वाचे असल्याचे डॉ. लम्पाऊ म्हणाल्या.

### संसाधनांचे जतन होईल

रानिया लम्पाऊ म्हणाल्या, योग्य ई-कचरा व्यवस्थापनामुळे सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासोबतच नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि हे पाऊल संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांची पूर्तता करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाचे ई-कचरा व्यवस्थापन केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्र या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तसेच ई-कचरा संकलन ही शिवाजी विद्यापीठातील नियमित प्रक्रियेचा भाग असेल आणि या संदर्भात काही लघु अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील. डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAY 2026
पुढारी

# ३४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल सत्रातील पदवी व पदव्युत्तर ४२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारी शांततेत पार पडल्या. ४० परीक्षा केंद्रांवर सुमारे ६ हजार ५०० विद्यार्थी उपस्थित होते. बी.ए., बी. बी. ए., एम.सी.ए., एम.टेक., बी. टेक., एम. बी. ए., बीबीए-एमबीए इंटिग्रेटेड प्रोग्राम, बी. आर्क. आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. एल.एल.एम., पीजीडीसीए, बी.सी.ए. आदींसह एम.एस्सी.च्या ३४ अभ्यासक्रमांचे निकाल बुधवारी जाहीर केले.

2 8 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई-कचऱ्याचा लहान मुलांना सर्वाधिक फटका

## डॉ. रानिया लम्पाऊ : विद्यापीठातील मिशन लाईफ अभियानात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे (ई-कचरा) अयोग्य व्यवस्थापन हे आज जागतिक स्तरावर मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. याचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत असल्याची चिंता ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार आणि विचारवंत डॉ. रानिया लम्पाऊ यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाच्या 'मिशन लाईफ अभियाना'अंतर्गत डॉ. लम्पाऊ यांचे 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या



मिशन लाईफ अभियानात बुधवारी ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ यांनी मार्गदर्शन केले.

विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

लहान मुलांची शरीरे प्रौढांच्या तुलनेत विषारी रसायनांना खूप लवकर बळी पडतात. कारण त्यांची जैविक संवेदनशीलता उच्च दर्जाची असते. त्यातच त्यांच्या शरीरात पर्यावरणातील विषारी घटकांचे शोषण वेगाने होते, तर दुसरीकडे मुलांमधील नैसर्गिक उत्सर्जन व विषमुक्ती यंत्रणा विकसित झालेली नसल्याचे डॉ. लम्पाऊ यांनी सांगितले. ई-कचरा संकलन ही नियमित प्रक्रियेचा भाग असेल. काही लघु अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील, असे डॉ. जाधव यांनी सांगितले. डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

### 'फाईव्ह आर' पंचसूत्री महत्त्वाची

■ या जागतिक संकटावर मात करण्यासाठी डॉ. लम्पाऊ यांनी सर्क्युलर इकॉनॉमी आणि फाईव्ह आर (5R) म्हणजेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर कमी करणे, पुनर्वापर, दुरुस्ती, नूतनीकरण आणि शास्त्रीय पद्धतीने पुनर्प्रक्रिया करणे या पंचसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

28 MAY 202[illegible]
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी रविवारी विवेकानंद महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. कामत यांचा पुष्पगुच्छ, शाल व संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार केला. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी कुलगुरू डॉ. कामत यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करताना सांगितले की, डॉ. कामत हे विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक म्हणूनही सेवा बजावली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या एकूण चौदा कुलगुरूंपैकी पाच कुलगुरू हे संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. यावेळी बोलताना डॉ. कामत म्हणाले, 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरू असा माझा प्रवास झाला आहे.'

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, डॉ. आर. व्ही. शेजवळ, हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.